NAAC Accredited 2015
'B+' Grade (CGPA -2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
# Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

केगांव, सोलापूर - ४१३ २५५ महाराष्ट्र
ईपीएबीएक्स ०२१७ -२७४४७७८ (११ लाईन्स)
विस्तृत क्र २२५ फॅक्स-०२१७-२७४४७७०
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac, www.sus.ac.in Email; dsw@sus.ac.in



## विद्यार्थी विकास विभाग / Department of Student Development

जावक क्र: पुआहोसोविसो/विद्यार्थी विकास/२०२२-२३/4648

दि. 21 JUN 2022

प्रति
**मा. प्राचार्य / प्राचार्या,**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

विषय:- विद्यार्थी पालकासह अपघात विमा योजनेतील विमा प्रिमीयमच्या रककमेबाबत...

महोदय / महोदया,

सोलापूर विद्यापीठ व विद्यापीठाशी संलग्नित असणा-या महाविद्यालयात सन २०२२-२३ या वर्षात सर्व विद्यार्थी व त्याचा एक पालक तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासाठी अपघात विमा योजना सुरु करण्यासाठी विद्यापीठाने खालील प्रमाणे प्रस्ताव स्विकारला असून या संदर्भात विद्यापीठाने **टाटा एआयजी जनरल इंन्सुरंस कंपनी ली., लातूर** या विमा कंपनीशी करार केला आहे.

त्यास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, प्रति विद्यार्थी व त्याचा एक कमावता पालक यांच्यासाठी रू ६८/- व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासाठी रू १३७/- प्रमाणे विमा प्रिमीयमची रक्कम महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांना आकारण्यात यावी. तसेच दोन्ही रक्कम वेगवेळया NFT व्दारे विमा कंपनीकडे पाठविण्यात याव्यात. उपरोक्त विमा प्रिमीयम मध्ये विद्यार्थी व त्याचा एक पालक यांच्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी खालील खालील प्रमाणे विमा सुविधा देण्यात येणार आहेत.

| Risk Cover for Students | 2) Risk Cover for Students singal earning Parent | Risk Cover for Teaching and Non Teaching |
|---|---|---|
| a) Accidental death – 10 lac<br>b) Permanent Total disability Rs. 10 lac<br>c) Permanent partial disability Rs. 5 lac (As per IRDA rules)<br>d) Hospitalization expenses including to & fro charges of Ambulance Rs.1,00,000/- (As per IRDA rules) | a) Accidental death 2.5 lac<br>b) Permanent total disability Rs. 2.5 lac<br>c) Permanent partial disability Rs. 1,25,000/- (As per IRDA rules) | a) Accidental death – 20 lac<br>b) Permanent Total disability Rs. 20 lac<br>c) Permanent partial disability Rs. 10 lac (As per IRDA rules)<br>d) Hospitalization expenses including to & fro charges of Ambulance Rs.2,00,000/- (As per IRDA rules) |

त्यानूसार (शनिवार व रविवार वगळता) (पत्रात खालीलप्रमाणे **इंग्रजी मध्ये एम एस एक्सलच्या सॉफ्ट कॉपीसह**) विमा कंपनीच्या पत्रात नमुद ई मेलवर पाठवावी. (**विमा यादी स्कॅनकरून, एम एस वर्ड फाईलमध्ये पाठविण्यात आलेल्या याद्या गृहीत धरण्यात येणार नाहीत**) तसेच विमा प्रिमीयमची सर्व रक्कम विमा कंपनीनी दिलेल्या तपशिलाप्रमाणे बँकेत ऑनलाईन, धनाकर्षाव्दारे भरणा करावा पैसे भरल्यानंतर त्याचा तपशिल (Transaction ID) व सोबत विमा लाभार्थ्यांच्या यादीची एक प्रत, विमा पावती, प्रथम वारसदार म्हणून (विमा पॉलीसी सुरू झाल्यानंतर अपघात घडल्यास त्याचा दावा करण्यासाठी) विद्यापीठाकडे पाठवावी. तसेच खालील प्रमाणे नियमाचे पालन महाविद्यालयांनी करावयाचे आहे.

१ ही योजना विद्यापीठ संकुल व संलग्नित महाविद्यालत प्रवेशीत विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासाठी लागु असेल.

HR Section / Student Section / A/C
- For necessary action. Pl.
- Inform to all the staff & students
- To display on notice board & College Website

23/6/22

Sinhgad College of Engineering, N. B. Navale, Vadgaon
Inward Gen-196
Date 23/06/22
Sign.

२ सदर योजना २४ तास ३६५ दिवस संपुर्ण भारत व जगभरात कोठे ही अपघात झाल्यास म्हणजेच विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा कुठेही कधी ही अपघाती मृत्यू झाल्यास, अपघातात अपंगत्व आल्यास नियमानुसार विमा क्लेम देण्यात येईल

३ विद्यार्थी,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा अपघातामुळे मृत्यू झाल्यास विमा रक्कम त्यांच्या वारसास देण्यात येईल

४. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा अपघात / मृत्यू झाल्यास महाविद्यालयाच्या प्राचार्यामार्फत २५ दिवसाच्या आत टपाल/फॅक्सव्दारे किवा इमेलव्दारे विद्यापीठास कळविणे आवश्यक आहे.

५ **या विमा याजनेत खालील प्रमाणे बाबींचा समावेश राहणार नाही.**

१. सध्याचे अपंगत्व २. भ्रमिष्टपणा. ३. अमंली पदार्थांच्या अंमलाखाली असताना झालेला अपघात व अपघाती मृत्यू.

४. आत्महत्येचा प्रयत्न, आत्महत्या किंवा जाणीव पुर्वक स्वत:ला जख्मी करून घेणे.

५. गुन्हयाच्या उद्देशाने कायद्याचे उल्लंघन करताना आलेला अपघात / मृत्यू.

६. विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा बेकायदेशीर कृत्यामध्ये असलेल्या सहभागामूळे झालेली दुखापत / मृत्यू.

७. महाविद्यालय / विद्यापीठ अधिविभागाच्या नियमाचे उल्लंघन करून बेशिस्त वर्तनामूळे किवा हिंसक आंदोलनात सहभागामुळे झालेली दुखापत / मृत्यू.

६ **विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्यास सादर करावयाची कागदपत्रे व त्याचा तपशील.**

विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा अपघाती मृत्यू झाल्यास खालील कागद पत्राची पुर्तता करून सदर कागदपत्रे प्राचार्य यांच्या सहीनीशी प्रमाणित करून २५ दिवसाच्या आत विद्यापीठाकडे व विमा कार्यालयाकडे पाठविण्यात यावेत.

१. प्राचार्या मार्फत पुर्ण भरलेला क्लेम फॉर्म, २.अपघाती मृत्यू झालेला असल्यास पोलीसात दिलेली तक्रार (FIR) ची प्रत, ३.पोलीस पंचनामा, ४.शवविच्छेदन अहवाल, ५.मृत्यू प्रमाणपत्र, ६.कॉलेज / विद्यापीठ ओळखपत्र, ७ विमा प्रिमीयमची पावती

**वारसदराचे विमा क्लेम मिळण्यासाठी सादर करावयाची कागदपत्रे व त्याचा तपशील.**

१.कॅन्सल्ड चेक/ बँक पासबुक २.आधारकार्ड, ३.पॅनकार्ड,

७ **महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभाग यांनी खालील बाबींची नोंद घ्यावी.**

१. सदर योजनेकरीता अटी व शर्तीबाबत निणर्य घेण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

२. विमा योजनेच्या अनुषंगाने वेळेत याद्या विमा कंपनीकडे पाठविणे व प्रस्तावासोबत प्राप्त होणारी कागदपत्रे सादर करावयाची जबाबदारी ही महाविद्यालयातील कर्मचारी तसेच प्राचार्य व विद्यापीठातील अधिविभाग प्रमुख यांची असेल.

**३.एखाद्या कागपत्राच्या पुर्ततेअभावी किवा अपुर्ण प्रस्तावामुळे प्रस्ताव अपात्र ठरल्यास त्याची जबावदारी विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.**

४ महाविद्यालय/अधिविभागाने प्रस्तावाची पुर्तता करताना सूची प्रमाणे तपासून.अनुक्रमाप्रमाणे पृष्ठांकित करून सादर करावेत.

तरी पुनश्च: आपणास विनंती आहे की, **प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या याद्या दोन दिवसात (शनिवार व रविवार व सुटी वगळता) विमा कंपनीस मेलव्दारे पाठविण्यात यावे व विद्यार्थी प्रवेशानंतर पाच दिवसाच्या आत विमा रक्कम महाविद्यालयांनी आपल्याकडे जमा न ठेवता विमा कंपनीकडे त्वरीत सोबत जोडलेल्या बँकेच्या तपशिलावर जमा पाठविण्यात यावी.** या उपरोक्त कोणत्याही महाविद्यालयाकडून विमा प्रिमीयमची रक्कम विमा कंपनीकडे पाठविण्यास दिरंगाई झाल्यास व त्या दरम्यान विद्यार्थ्यांचा अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी ही विनंती.

कळावे,

आपला स्नेहांकित,

प्र. कुलसचिव

| Sr. No | Insured/ student Name | Age/Dob | Student Gender | Students Parents & Nomine Name | Students Parents& Nomine Age | Students Parents Nomine Gender | Relation of Student |
|---|---|---|---|---|---|---|---|

सोबत: टाटा एआयजी जनरल इंन्सुरंस कंपनी ली., लातूर यांचे बँक तपशिलाचे पत्र

Ahilyadevi Holkar Solapur University (DSD ...)